# चंद्रपूर जिल्हा पोलीस वार्तापत्र
## कार्यालय पोलीस अधीक्षक, चंद्रपूर

Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in

२४ जुलै, २०१९

☎ : 07172-264300
: 07172-255800
: 7447744100 (PRO)

## ➢ तंबाखुजन्य पदार्थ प्रतिबंधक कायदयातंर्गत (COTPA) पोलीसांची प्रभावी कार्यवाही:—

पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांनी जिल्हयाचा पदभार घेतला तेव्हापासुनच सिगारेट व अन्य तंबाखुजन्य पदार्थ प्रतिबंधक कायदयाची कठोर अंमलबजावणी करण्याकरीता प्रभारी अधिकारी यांना वेळोवळी सुचना व मार्गदर्शन केले आहे. यापार्श्वभुमीवर कायदयाची अमंलबजावणी करतांना शाळा महाविद्यालयांच्या १०० मीटर परिसरात तंबाखुजन्य पदार्थ आढळु नये या करीता पोलीस वेळोवेळी कार्यवाही करीत आहे. चालु वर्ष आतापावेतो जिल्हयातील वेगवेगळया पोलीस स्टेशन अंतर्गत सिगारेट व अन्य तंबाखुजन्य पदार्थ प्रतिबंधक कायदयान्वये एकुण १८८ केसेस करण्यात आल्या असुन यामध्ये ३७,६००/—रू दंड वसुल करण्यात आला आहे.

————————————————————————————————

## ➢ एमपीडीए कायदयाअंतर्गत चंद्रपुर पोलीसांची कार्यवाही:—

ज्याव्यक्ती समाजात राहणे धोकादायक असतात किंवा त्यांचे विरूध्द वेळोवेळी पोलीस कार्यवाही करून सुध्दा त्यांचे कृत्यात बदल होत नाही अशा गुन्हेगारांविरूध्द एमपीडीए कायदयान्वये कार्यवाही केली जाते. पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात आरोपी नामे विष्णु घनश्याम कंजर, वय ४० वर्ष रा. कंजर मोहल्ला चंद्रपुर याचे विरूध्द अशा प्रकारची कार्यवाही करण्यात आली असुन नमुद आरोपी याची एक वर्षाकरीता जेल रवानगी करण्यात आली आहे. आरोपी विष्णु कंजर याचे विरूध्द दारूबंदी कायदयातंर्गत व इतरही गून्हयांची तसेच वेळोवेळी पोलीसांनी केलेल्या प्रतिबंधक कार्यवाही प्रस्तांवाची नोंद आहे. दिंनाक ११ जुलै २०१९ रोजी याबाबत आदेश पारित झाला असुन दिंनाक २१ जुलै रोजी पोलीसांनी विष्णु कंजर याचा शोध घेवुन त्यास अटक केली व जेल मध्ये दाखल केले आहे.

————————————————————————————————

## ➢ चंद्रपुर जिल्हयात दारू पुरवठा करणाऱ्या परवानाधारक विक्रेत्यांचा परवाना रदद्:

चंद्रपुर जिल्हयात दारूबंदी असुन जिल्हयात दारू तस्करी आणि विक्री करणाऱ्यांवर पोलीसांकडुन वेळोवेळी कार्यवाही करण्यात येते. दारूबंदी क्षेत्रामध्ये जिल्हालगत असलेल्या जिल्हयातील परवाना धारक दुकानदार त्यांचे कडुन दारू पुरवठा होत असल्याचे तपासादरम्यान निष्पन्न होताच प्रभावी कार्यवाही करण्यासाठी सदर परवानाधारक यांचा परवाना रदद् करण्यासाठी जिल्हयातील संबंधीत विभागाकडे प्रस्ताव पाठविण्यात येत असतो. पोलीस अधीक्षक चंद्रपु यांचे मार्गदर्शनात अशाच प्रकारची प्रभावी कार्यवाही करण्याकरीता २०१८ मध्ये ५ व सन २०१९ मध्ये ५ असे एकुण १० प्रस्ताव यवतमाळ, भंडारा व नागपुर येथे संबंधीत विभागाकडे पाठविण्यात आले असुन यापैकी नागपुर येथील मेहुल अडवाणी याचे दारू दुकानाचा परवाना रदद् झाल्याचा आदेश पारित झाला आहे. यापुढे पोलीस विभागाकडुन अशा प्रकारची कार्यवाही करण्यात येणार आहे.

---

## ➢ दारूबंदी प्रभावी कार्यवाही करीता पोलीसांची दत्तक गाव/मोहल्ला योजना:—

चंद्रपुर जिल्हा हा संपुर्ण दारूबंदी घोषीत आहे. पोलीस दलास कायदा व सुव्यवस्था त्याचप्रमाणे इतरही तपास कामे सांभाळत उपलब्ध असलेल्या मनुष्यबळाचा उपयोग करीत दारूबंदी अंतर्गत प्रभावी कार्यवाही करण्याकरीता अहोरात्र मेहनत घ्यावी लागत आहे. यातुनच चंद्रपुर पोलीस विभाग वेळोवेळी कार्यवाही करीत आहे. पोलीस स्टेशन अंतर्गत ज्या गावामधुन किंवा मोहल्ल्यामधुन दारूबंदी संदर्भात जास्त प्रमाणात तक्रारी येतात किंवा दारू विक्री करणारे सराईत आरोपी अशा क्षेत्रामध्ये वास्तव्यास असतात असे गाव किंवा तो मोहल्ला दारूमुक्त करण्यासाठी पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात दत्तक गाव/मोहल्ला ही मोहिम सुरू केली असुन त्याबाबत पोलीस स्टेशन प्रभारी अधिकारी यांना टार्गेट देण्यात आले आहे. ही मोहिम यशस्वी करण्याकरीता त्यांचे स्तरावर कार्यवाही, बैठका तसेच इतरही उपाययोजना करीत आहे.

---

☎ : 07172-264300
: 07172-255800
Email : sp.chandrapur@gmail.com, sp.chandrapur@mahapolice.gov.in
: 7447744100 (PRO)

# साईबाबा बिगर शेतकरी सहकारी पतसंस्था मर्यादीत, आवाळपुर संचालक मंडळाविरूध्द आर्थिक गुन्हे शाखेचे कार्यवाही

पो.स्टे. गडचादुंर येथील फिर्यादी गुंतवणुकदार श्री. दिवाकर माधव उपरे वय ५२ वर्ष धंदा नौकरी सध्या पत्ता आवळपुर ता. कोरपणा जि.चंद्रपुर यांनी दिंनाक १८/०७/२०१९ रोजी फिर्याद दिली की साईबाबा बिगर शेतकरी सहकारी पतसंस्था मर्यादीत, आवाळपुर पतसंस्थेमध्ये ९,८४,०००/—रूपयाची गुंतवणुक केली होती. परंतु मुदतपुर्ण होवुन सुध्दा पैसे परत केले नाही त्यामुळे प्राप्त फिर्यादीवरून पो.स्टे. गडचांदुर येथे **अप क्र २८३/२०१९ कलम ४०६,४०९,४२०,३४, भा.द.वि सहकलम ३ एम.पी.आय.डी ॲक्ट १९९९ अन्वेय आरोपी नामे,** १) अध्यक्ष विठठल उध्दव डाहुले रा. आवळपुर २) सचिव किसन पेचे रा. आवाळपुर ३) कोषाध्यक्ष महादेव अवताडे रा. आवाळपुर ४) उपाध्यक्ष महादेव अवताडे रा. आवाळपुर व इतर ७ सदस्य तसेच कार्यालयीन व्यवस्थापक १) अविनाश बबनराव चौधरी २) विकास विठठल डाहुले दोन्ही रा. आवाळपुर याचे विरूध्द गुन्हा नोदं करण्यात आला. सदर प्रकरणात वरील पैकी ४ आरोपीतांना आर्थिक गुन्हे शाखेनी दिंनाक १९/०७/२०१९ रोजी अटक केली असुन त्यांना मा.न्यायालयाने ७ दिवस पोलीस कस्टडी देण्यात आली आहे.

फिर्यादी व पतसंस्थेचे अध्यक्ष सचिव व्यवस्थापक हे अल्ट्राटेक सिमेंट फॅक्टी आवाळपुर येथे एकत्र कामाला होते. पंतसंस्थेचे अध्यक्ष आरोपी हे अल्ट्राटेक सिमेंट फॅक्टी मधुन सेवानिवृत्त झालेले किंवा इतर कार्यालयातुन सेवानिवृत्त झालेले ग्राहकाकंडे जावुन त्यांना सदर पतंसंस्थेच्या विविध प्लानबाबत माहीती सांगुन गुंतवणुक केल्यास आपणास बॅक किवा पोस्टांपेक्षा जास्त व्याजदर मिळेल असे सागुन सर्व पैसे गुंतवणुक करून घेत होते. गुंतवणुक झालेल्या ग्राहकांचे पैसे परत न करता गुंतवणुकदार यांचे पैसे जमीन विकत घेणे, बनावट कर्ज दाखविणे, तसेच काही गुंतवणुकदारानी आरडी योजनेत पैसे गुंतविले असतांना आरडी विड्राल होताच त्यां पैसाची पुन्हा पतसंस्थेत गुंतवणुक करून घेतली. दिड ते दोन वर्षापासुन पैसे परत न करता गुंतवणुकदारांचा विश्वासघात करून त्यांची फसवणुक केली आहे. सदर प्रकरणात ४०० ते ४५० गुंतवणुकदाराची फसवणुक होवुन यामध्ये अंदाजे अडीच ते तीन कोटी रूपयाची फसवणुक झाल्याचे प्राथमिक तपासात दिसुन येत आहे.

सदर गुन्हयाचा तपास श्री. डॉ. महेश्वर रेडडी, पोलीस अधीक्षक चंद्रपुर यांचे मार्गदर्शनात आर्थिक गुन्हे शाख प्रभारी पोनि. श्री. किसन शेळके, सपोनि. राठोड, सफौ. विजय गिणगुले, पोहवा. संजय नेरकर, गजानन निमकर, सुरेश धाडसे, लायक ढाले, मपोशि. सुकेशनी चालखुरे हे करीत आहेत.

---